पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ६१ दिनांक - २३/०१/२०२४**

मुंढवा पोलीस ठाणे पुणे शहर

**मुंढवा बिट मार्शलचे कर्तव्य तत्परतेमुळे विजयानगर पोलीस ठाणे, मैसुर, कर्नाटक येथील दाखल असलेल्या गुन्हयातील पिडीत मुलगी सुखरुप कुटूंबिय व पोलीसांचे ताब्यात.**

दिनांक २२/०१/२०२४ रोजी विजयानगर पोलीस ठाणे, मैसुर, राज्य कर्नाटक येथील गुन्हा रजि.नंबर ०९/२०२४,भादंवि कलम ३६३ मधील पिडीत मुलगी बी.टी.कवडे रोड,घोरपडी गाव,पुणे या भागात असल्याची माहिती प्राप्त झाल्याने स्थानिक पोलीस ठाणे मदत घेवुन,सदर मुलीचा शोध घेणे असल्याने मुंढवा पोलीस ठाणे येथे आले होते.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.महेश बोळकोटगी यांनी तात्काळ घोरपडी बिट मार्शलवरील पोलीस अंमलदार,विजय माने, किरण बनसोडे यांना बोलावुन घेवून,सदर घटनेची व सदर पिडीत मुलीचा शोध कोणत्या प्रकारे घ्यावा याबाबत मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे मैसूर पोलीस ठाणे कडील अंमलदार व मुंढवा पोलीस ठाणे कडील अंमलदार यांनी सुमित्रा कॉर्नर,बी.टी.कवडे रोड,पुणे याठिकाणी जावुन प्रथम पिडीत मुलीची आजु-बाजुस माहिती घेवुन खात्रीशिर माहिती प्राप्त करुन पिडीत मुलीस ताब्यात घेण्यात आले.

पिडीत मुलीस पोलीस ठाणे येथे घेवुन येवुन पुढील कायदेशीर कारवाई करणेकरीता मैसुर पोलीस ठाणे कडील पोलीस अंमलदार व पिडीत मुलीचे नातेवाईक यांचे ताब्यात सुखरुप देण्यात आले आहे. मुंढवा पोलीस ठाणेकडील पोलीसांचे या तत्पर कामगिरीबद्‌ल मैसुर पोलीस व मुलीचे नातेवाईक यांनी कौतुक करून, पुणे शहर पोलीस दलाचे आभार मानले आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-५,श्री.आर.राजा, मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे,श्रीमती.आश्विनी राख यांच्या मार्गदर्शनाखाली मुंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.महेश बोळकोटगी यांचे सुचानाप्रमाणे पोलीस अंमलदार, विजय माने व किरण बनसोडे यांनी केली आहे.